# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 03-06-2025

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये सावनेर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-06-03 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2025-06-04 | 2025-06-05 | 2025-06-06 | 2025-06-07 | 2025-06-08 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.2 | 0.4 | 0 | 0 | 1 |
| कमाल तापमान (अं.से) | 37.4 | 36.9 | 37.9 | 39.4 | 39.9 |
| किमान तापमान (अं.से) | 28.4 | 28.1 | 27.9 | 28.7 | 28.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 47.7 | 44.6 | 37.9 | 39.6 | 48.8 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 19.6 | 24.5 | 18.8 | 16.8 | 19.4 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11.5 | 10 | 8.6 | 11.7 | 18.7 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 273.6 | 300.3 | 345.4 | 326.3 | 322.1 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 4 | 4 | 1 | 3 | 3 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील ५ दिवस दिनांक ०४ ते ०८ जून २०२५ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०४ आणि ०८ जून २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता, • दिनांक ०५ जून २०२५ रोजी खूप हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ०६ व ०७ जून २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाचा अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ०८ ते १४ जून २०२५ दरम्यान सरासरी पेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता, कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • दिनांक ०५ जून २०२५ रोजी वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक ०६ व ०७ जून २०२५ रोजी वादळी वाऱ्यासह (४० ते ५० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### कृषि सल्ला:

सामान्य कृषी सल्ला: • मागील आठवड्यात काही ठिकाणी झालेल्या पावसामुळे जमिनीतील उपलब्ध ओलावा लक्षात घेता, पूर्व मशागतीचे कामे करण्यास प्राधान्य द्यावे. विदर्भासाठीचा ०८ ते १४ जून २०२५ दरम्यान चा विस्तारित स्वरूपाचा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज लक्षात घेता अपुऱ्या ओलाव्यामध्ये शेतकरी बांधवांनी पेरणीची घाई करू नये. • मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. जिल्ह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस, कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा. • जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा फायदा घेत कापणी झालेल्या शेतात खोल नांगरणी करणे उपयुक्त ठरते, त्यामुळे जमिनीत सुप्त अवस्थेत असलेले कीटक, अळी किंवा को • श अजिबात सूर्यप्रकाशात व पक्ष्यांच्या शिकारीसाठी उघडे पडतात. • आगामी खरीप हंगामात जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी, खरीप हंगामासाठी तयारी म्हणून जमिनीची नांगरणी ही समतल रेषेवर आणि उताराच्या विरुद्ध दिशेने करावी.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तूर | • तूर लागवडीकरिता जमिनीच्या प्रकारानुसार वाणाची निवड करावी. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीच्या वाण (टीएटी-१०, आयसीपीएल ८७, एकेटी- ८८११) मध्यम ते भारी जमिनीकरिता मध्यम कालावधीचे वाण (बीएसएमआर- ७३६, पिकेव्ही तारा, बीएसएमआर- ८५३) आणि भारी जमिनीकरिता जास्त कालावधीच्या (आंयसीपीएल- ८७११९, सी-११) वाणाची निवड करावी. |
| मुग | • मुग लागवडीसाठी पिकेव्ही ग्रीन गोल्ड, पिकेव्ही मुग – ८८०२ या वाणाची निवड करावी. |
| काळे सोने / चारकोल | • उडीद लागवडीसाठी पिकेव्ही उडीद -१५, टीएयु- १, टीएयु- २, पिडीकेव्ही ब्लॅक गोल्ड (एकेयु-१०-१) या वाणाची निवड करावी. |
| कपाशी | • मागील हंगामातील पीक उरलेले खोड व झाडांचे भाग शेतातून स्वच्छ करून टाकावेत. उखडलेले कपाशीचे खोड शेताच्या बांधांवर साठवू नयेत. मागील पिढीतील गुलाबी बोंडअळी ही बाधित बोंडे, खोड किंवा मातीमध्ये सुप्तावस्थेत शिरते. त्यामुळे अशा बाधित अवशेषांचे त्वरित नाश करावा, जेणेकरून गुलाबी बोंडअळीचा जीवनचक्र खंडित करता येईल. मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या शेतांमध्ये पीक पद्धतीत फेरबदल (पिक फेरपालट) करावी, जेणेकरून गुलाबी बोंडअळीचा जीवनचक्र तुटेल. कपाशीचे पावसाळ्यापूर्वी (पूर्वमान्सून) पेरणी करणे टाळावे. कारण लवकर पेरलेले पीक लवकरच फूल व पात्या तयार होतात आणि मागील हंगामातील सुप्त अवस्थेतील गुलाबी बोंडअळीचे पतंग त्यावर अंडी घालतात. त्यामुळे अशा पिकातून नव्या हंगामातील पहिली पिढी तयार होते व वेळेवर पेरलेल्या पिकावरही प्रादुर्भाव वाढतो. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हळद | • हळद लागवडीसाठी सेलम, कृष्णा, फुले स्वरूप इत्यादी सुधारित वाणाची निवड करावी. |
| आंबा | • बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. वादळी वाऱ्यामुळे झाडावरील फळे गळण्याची शक्यता असल्याने झाडाखाली प्लास्टीक शीट अंथरून फळे गळल्यास फळांची प्रतवारी करून चांगल्या प्रतीच्या फळांची विक्री करावी. |
| संत्रा | • नवीन बागेची लागवड करण्यासाठी मातीची योग्यता तपासणे आवश्यक आहे. मातीची खोली किमान १ मीटर असली पाहिजे परंतु खत कार्यक्रमासह अचूकतेवर आधारित लागवड पद्धतींचा अवलंब केल्यास १ मीटरपेक्षा कमी खोलीच्या जमिनीवरही तितक्याच उच्च कार्यक्षमता असलेल्या बागा उभारता येतात. मातीची जागा शक्यतो चांगला निचरा होणारी, ६०% पेक्षा कमी चिकणमाती, ८.३ पेक्षा कमी पीएच, १२% पेक्षा कमी कॅल्शियम कार्बोनेट मुक्त आणि २ मीटरपेक्षा जास्त क्षेत्राची पाण्याची पातळी निवडली पाहिजे. • लिंबूवर्गीय लागवडीसाठी बनवलेले खड्डे २ भाग माती, एक भाग वाळू आणि १ भाग शेतातील खत असलेल्या मिश्रणाने भरता येतात. याव्यतिरिक्त, प्रत्येक खड्ड्यात १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट, १ किलो कडुनिंबाची पेंड आणि १०० ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर घाला. • लिंबूवर्गीय बागेतील नर्सरीने बागेतील माती, शेणखत आणि वाळूच्या मिश्रणाने पॉलिथिन पिशव्या भरण्यास सुरुवात करावी. पिशव्यांवर पाण्यासाठी योग्य छिद्र करावे. • ताणाच्या काळात ताण असलेल्या झाडांवर पाऊस पडला तर झाडांवर क्लोरमेक्वाट क्लोराइड हे वाढ रोधक २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. • अंबिया पिकाच्या फळांचा आकार वाढवण्यासाठी आणि दोन पावसाच्या दरम्यान एक आठवड्यापेक्षा जास्त अंतर असल्यास पोटॅशियम नायट्रेट १.५ किलो + २, ४, डी १.५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात फवारावे. • झाडाच्या खोडाजवळ पाणी साचू नये म्हणून, झाडाच्या खोडाभोवतीची माती समतल करा. पावसाळ्यात बागेतून अतिरिक्त पाणी काढून टाकण्यासाठी उताराच्या बाजूने झाडांच्या प्रत्येक २ ओळींनंतर ड्रेनेज चॅनेल (खंदकाचा आकार: ३० सेमी खोली, ४५ सेमी वरची रुंदी आणि ३० सेमी तळाची रुंदी) तयार करावेत. ठिबक प्रणालीचे बाजूचे भाग गुंडाळावेत. पावसाळा सुरू झाल्यानंतर झाडाच्या खोडातील पालापाचोळा काढून टाकावा. • लिंबूवर्गीय फळांवरील फायटोप्थोरा रोग नियंत्रित करण्यासाठी जर आधी लावला नसेल तर झाडाच्या खोडांवर बोर्डो पेस्ट लावा. एका प्लास्टिकच्या डब्यात रात्रभर १ किलो चुना आणि १ किलो कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात वेगवेगळे मिसळून पेस्ट तयार करा. दुसऱ्या दिवशी दोन्ही मिश्रण दुसऱ्या डब्यात मिसळा जेणेकरून पेस्टचा रंग आकाशी निळा होईल. तांब्याच्या आवरणाची उपस्थिती पाहण्यासाठी लोखंडी रॉड बुडवून मिश्रणाची चाचणी करा. मातीच्या पातळीपासून २४ इंच अंतरावर झाडाच्या खोडावर पेंट ब्रशने लावा. ही पेस्ट |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | मिसळल्यानंतर १२ तासांच्या आत लावावी. • या महिन्यात लिंबूवर्गीय फळांचा प्रादुर्भाव वेगाने होतो म्हणून प्रभावित पाने, फांद्या छाटून जाळून टाकाव्यात. पावसाळा सुरू होण्यापूर्वी कॉपर ऑक्सिक्लोराईड १८० ग्रॅम आणि स्ट्रेप्टोसायक्लिन ६ ग्रॅम ६० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ३० दिवसांच्या अंतराने ३-४ वेळा फवारणी पुन्हा करा. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. |